1


# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे कार्यालय

(बीएसएनएल "संचार लक्ष्मी" इमारत,कस्तुरचंद पार्क समोर, नागपूर-४४० ००१, दुरध्वनी क्रमांक ०५-०७१२-२५६४ ५६१)

महाराष्ट्र वन विभाग

Email id :-ccftnagpur@mahaforest.gov.in


**आदेश**

विषय - वनपाल संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या व पदस्थापना.

जा.क्रमांक कक्ष-१/आस्था/अ/बदलीसत्र/२०१७/प्र.क्र.१४(१७-१८)/ 3371

नागपूर - दिनांक 17/01/2018

संदर्भ :- १. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक कक्ष-१/ आस्था/ अ/ बदली सत्र / २०१७/प्र.क्र.१४(१७-१८)/६९८ दिनांक ३०.०५.२०१७

२. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक कक्ष-१/ आस्था/ अ/ बदली सत्र / २०१७/प्र.क्र.१४(१७-१८)/१६१० दिनांक ०३.०८.२०१७

३. नागरी सेवा मंडळाची बैठक दिनांक ०२/०१/२०१८

४. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१/आस्था/अ/बदलीसत्र/२०१७/प्र.क्र.१४(१७-१८)/१३८८ दिनांक १६/०१/२०१८

५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-१०(२)/आस्था/तीन/प्र.क्र./२००९/१७-१८ दिनांक १६/०१/२०१८

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये वनपाल संवर्गातील कर्मचाऱ्यांचे बदली आदेश जारी करण्यात आले होते. तथापि संबधित वनपालांनी सदर आदेशात त्यांचे वैयक्तिक व कौटुंबिक अडचणी लक्षात घेवून पदस्थापनेच्या स्थानात बदल करण्याबाबतचे विनंती अर्ज सादर केले होते. त्या अनुषंगाने नागरी सेवा मंडळाचे बैठकीतील समितीने केलेल्या शिफारसीनुसार संबधित वनपालांचे पदस्थापनेत अशंत बदल करण्याबाबत प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) महाराष्ट्र राज्य नागपूर यांना पूर्व मान्यतेस सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासकिय अधिकाऱ्यांचे बदल्यांचे विनीयमन आणि शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण दोन कलम ४ (४) (दोन) व (५) चे तरतुदीनुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

उक्त मान्यतेच्या अधिन राहुन संदर्भिय क्रमांक २ मधील आदेशात खालीलप्रमाणे अशंत: बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वनपालांचे नाव (सर्व श्री ) | संदर्भ क्रमांक २ च्या आदेशातील बदली व पदस्थापनेचे ठिकाण | संदर्भ क्रमांक २ च्या आदेशातील बदल | शेरा |
|---|---|---|---|---|
| २ | आर. एन. चिखले, वनपाल, कळमेश्वर नागपूर वनविभाग | वनपाल, सामाजिक वनीकरण कुही, सावधी नागपूर | वनपाल, सामाजिक वनीकरण, कळमेश्वर, सामाजिक वनीकरण, नागपूर | विनंतीनुसार अशंत: बदल |
| ५ | एस. एन. वंजारी, वनपाल, बानोर, नरखेड वनपरिक्षेत्र नागपूर वनविभाग | क्षेत्र सहाय्यक, अडेगाव बोर अभयारण्य पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर | वनपाल, सामाजिक वनीकरण, नरखेड, सामाजिक वनीकरण, नागपूर | विनंतीनुसार अशंत: बदल |

Chief Conservator of Forests Nagpur

Scanned by CamScanner

सदर आदेश तात्काळ प्रभावाने अमंलात येतील. संबधित नियंत्रण अधिकारी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त नमुद आदेशानुसार संबधित वनपालांना नविन बदलीचे ठिकाणी रुजु होण्यास्तव तात्काळ कार्यमुक्त करावे व रूजू करुन घ्यावे तसेच कार्यमुक्तीचा दिनांक या कार्यालयास कळविण्यात यावा.

उपरोक्त वनपाल यांची बदली त्यांचे विनंतीनुसार करण्यात आल्याने नियमानुसार त्यांना बदली प्रवास भत्ता व पद ग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

(संजीव गौड)
मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक), नागपूर.

प्रति,
१. श्री. आर. एन. चिखले, वनपाल,
२. श्री. एस. एन. वंजारी, वनपाल
मार्फत :- संबधित नियंत्रण अधिकारी

प्रतिलीपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग)महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीस सादर
प्रतिलीपी :- मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक,पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांना माहिती तथा पूढील कार्यवाहीस सस्नेह अग्रेषीत.
प्रतिलीपी :- वनसंरक्षक सामाजिक वनीकरण नागपूर यांना माहिती तथा पूढील कार्यवाहीस अग्रेषीत.
प्रतिलीपी :- उपवनसंरक्षक, नागपूर वन विभाग, नागपूर यांना माहिती तथा पूढील कार्यवाहीस अग्रेषीत.
प्रतिलीपी :- विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, भंडारा, नागपूर, वर्धा व गोंदिया, यांना माहिती तथा पूढील कार्यवाहीस अग्रेषीत.
प्रतिलीपी :- www.mahaforest.gov.in



Scanned by CamScanner